# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

# प्रेस नोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०४/१०/२०२१

---

**''आपल्या संभाषण चार्तुयाने लोकांना बोलण्यात गुंतवून हात चलाखीने दागिने लुटणा-या, १२५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असणा-या, ब-याच गुन्हयात पाहीजे असलेला सराईत गुन्हेगारास *नवी मुंबई गुन्हेशाखा कक्ष-१* यांनी अटक करून आरोपीकडून एकुण ०५ बतावणीचे गुन्हे (नवी मुंबई -०३, मुंबई शहर- ०२) उघडकीस आणून फसवणूक केलेली संपूर्ण मालमत्ता -८८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण २,६८,०००/-रु कि. मुददेमाल हस्तगत''**

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात रबाळे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३७७/२०२१ भा.द.वि. कलम ४२०,४०६ प्रमाणे दिनांक २१/०९/२०२१ रोजी गुन्हा दाखल आहे. नमूद गुन्हयातील फिर्यादी रिक्षा चालक यांना एका अनोळखी आरोपीने बोलण्यात गुतंवून ' मला ज्वेलर्सचा वजन काटा चेक करायचा आहे' असे सांगून फिर्यादीस त्यांचे गळयातील सोन्याची चैन देण्यास भाग पाडून वजन काटा चेक करून येतो असे बोलून सोन्याची चैन घेवून जावून फसवणूक केलेबाबत गुन्हा दाखल आहे. तसेच यापूर्वी जून महिन्यात कोपरखैरणे व तुर्भे पोलीस ठाणे हददीत अशाच प्रकारे लोकांना बोलण्यात गुतंवून त्यांचेकडील सोन्याचे दागिने विश्वासाने प्राप्त करून पसार झालेल्या आरोपीबाबत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**मा. पोलीस आयुक्त श्री.बिपीनकुमार सिंह सो,मा. सह पोलीस आयुक्त श्री जय जाधव सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये सो, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री सुरेश मेंगडे सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री विनोद चव्हाण सो, यांनी सदरचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत पोलीस ठाणे व गुन्हे शाखेस आदेशीत केले होते.**

रबाळे, कोपरखैरणे व तुर्भे पोलीस ठाणे हददीत दाखल असणा-या गुन्हयांचा समांतर तपास करून ***नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष-१ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुनिल शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक निलेश पाटील, पोहवा/१०३१ पाटील, पोना/२८८३ निलेश किंद्रे, पोना/२६८३ जगदाळे, पोशि/३५३८ मिसाळ, पोशि/३५४२ कुटे***यांचे सीसीटीव्ही फुटेज पाहणेकरीता पथक तयार करण्यात आले. सदर पथकाने घटनास्थळ परिसर ते कल्याण शिलफाटा रोड, मुंब्रा या दरम्यान असणारे सीसीटीव्ही कॅमे-याचे फुटेज पाहून व इतर तांत्रिक बाबींचा तपास केला असता आरोपीचे वर्णनावरून सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील आरोपी नामे किरण रमणिकलाल शहा असल्याचे पोना/२८८३ निलेश किंद्रे यांनी निष्पन्न केले.

त्यानंतर वर नमूद पथकास अटक आरोपी हा तुर्भे परिसरात येणार असल्याचे तांत्रिक तपासाद्वारे निष्पन्न झाल्याने दिनांक २३/०९/२०२१ रोजी तुर्भे रेल्वे स्टेशन बाहेर सापळा रचून आरोपीस शिताफीने अटक केली. **आरोपीकिरण रमणिकलाल शहा वय ४० वर्षे,हिमालय सोसायटी, वाल्मिक नगर, झोपडपटटी, रूम नं. ०६ आंबेडकर पुतळयाजवळ, घाटकोपर मुंबई येथील मूळचा राहणारा असून, आरोपी हा मूळ पत्त्यावर न राहता तो ब-याच गुन्हयात पाहीजे असल्याने व त्याचेविरुध्द अजामीनपात्र**

**वॉरंट निघाल्याने मुंबई मेट्रोपॉलीटन रिजनमध्ये वेगवेगळया लॉजिंग/बोर्डींगमध्ये राहतो.** अटक आरोपीकडेगुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याने अशाप्रकारचे गुन्हेकेल्याची कबूली दिली.

नमूद आरोपीस रबाळे पो. ठाणे गु.र.क्र. ३७७/२०२१ भा.द.वि. कलम ४२०,४०६ या गुन्हयात दिनांक २३/०९/२०२१ रोजी १९.१५ वा. अटक केली. त्याची एकुण ०५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मिळूवन आरोपीकडे कसोशीने तपास करुनत्याने **संभाषण चार्तुयाने लोकांना बोलण्यात गुंतवून हात चलाखीने बतावणी (फसवणुक) केलेले** एकुण ०५गुन्हे उघडकीस आणून गुन्हयातील बतावणी द्वारे फसवणूक केलेलीपूर्ण मालमत्ता एकुण **२,६८,०००/-रु कि. ८८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा मुददेमाल हस्तगत केला.**

- **<u>अटक आरोपी किरण रमणिकलाल शहा याचेकडून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत:-</u>**

१) **रबाळे पो. ठाणे गु.र.नं.३७७/२०२१ भा.द.वि. कलम ४२०,४०६** ( ३५ ग्रॅम वजनाची चैन )

२) **तुर्भे पो. ठाणे गु.र.नं. १६९/२०२१ भादवि कलम ४२०,५०४** (१६ ग्रॅम वजनाचीचैन **व** ०७ ग्रॅम वजनाचीअंगठी )

३) **कोपरखैरणे पो. ठाणे गु.र.नं. १८७/२०२१ भादवि कलम ४२०,५०४**(१२ ग्रॅम वजनाची चैन )

४) **पवई पो. ठाणे, मुंबई शहर गु.र.नं. ४०२/२०२१ भादवि कलम ४२०**(४ ग्रॅम वजनाची चैन२ ग्रॅम
वजनाची अंगठी)

५) **ओशिवरा पो. ठाणे, मुंबई शहर गु.र.नं. ५८/२०२१ भादवि कलम ४२०**(१२ ग्रॅम वजनाची चैन)

- **<u>आरोपीची गुन्हे करण्याची पध्दत:-</u>** सदरचा आरोपी हा अंगावर सोन्याचे दागिने असणा-या लोकांना लक्ष्य करून,**आपल्या संभाषण चार्तुयाने लोकांना बोलण्यात गुंतवून,**तुम्ही एका महिलेला हात लावला आहे, तुम्ही गर्भवती महिलेला मोटार सायकलवरून कट मारला आहे, असे वेगवेगळे कारणे सांगून सदर महिलेला तुमच्या गळयातील चैन अगर हातातील अंगठी दाखवून तुम्ही ती व्यक्ती आहे किंवा नाही याची खात्री करून येतो, असे बोलून लोकांना त्यांचे दागिने देण्यास भाग पाडतो. त्यानंतर सदरचे दागिने घेवून जावून पसार होतो.

- **<u>अटक आरोपी किरण रमणिकलाल शहा याची गुन्हेगारी पार्श्वभूमी :-</u>**

१) वाकोला पोलीस ठाणे गु.र.नं.३८५/२००७ भादविक ३७९,३४
२)माहिम पोलीस ठाणे गु.र.नं.५२/२०१२ भादविक ४२०, ३४
३)भांडुप पोलीस ठाणे गु.र.नं.९४/२०१३ भादविक ४२०, ५०६, ३४
४)भांडुप पोलीस ठाणे गु.र.नं.२३८/२०१३ भादविक ३०९
५)वाकोला पोलीस ठाणे गु.र.नं.१५९/२००७ भादविक ४२०,३४
६)वकोला पोलीस ठाणे गु.र.नं.३२३/२००७ भादविक ३७९,३४
७)भांडुप पोलीस ठाणे गु.र.नं.१००/२०१३ भादविक ३९२, ३४
८)वाकोला पोलीस ठाणे गु.र.नं.३४३/२००७ भादविक ४२०, ३४
९)बिकेसी पोलीस ठाणे गु.र.नं.१३/२०१३ भादविक ४२०, ३४
१०)वाशी पोलीस ठाणे गु.र.नं.३२०/२०१२ भादविक ४२०,
११)एनएमजोशी मार्ग पोलीस ठाणे गु.र.नं.१३९/२००९ भादविक ४५७, ३८०
१२)वाकोला पोलीस ठाणे गु.र.नं.१३०/२००७ भादविक ४२०, ३४

१३)बिकेसी पोलीस ठाणे गु.र.नं.९१/२०१३ भादविक ४२०,३४.
१४)बिकेसी पोलीस ठाणे गु.र.नं.१५८/२०१३ भादविक ४२०,३४.
१५)माहिम पोलीस ठाणे गु.र.नं.५२/२००९ भादविक ४२०, ३४
१६)वाकोला पोलीस ठाणे गु.र.नं.१३०/२००७ भादविक ४२०,३४
१७)वाकोला पोलीस ठाणे गु.र.नं.५९६/२००७ भादविक ४२०,३४
१८)बिकेसी पोलीस ठाणे गु.र.नं.१५८/२०१२ भादविक ४२०,३४
१९)भांडुप पोलीस ठाणे गु.र.नं.३६/२०१३ भादविक ४२०, ३४.
२०)एनएमजोशी मार्ग पोलीस ठाणे गु.र.नं.१०५/२०१९ भादविक ४२०,३४
२१)वाशी पोलीस ठाणे गु.र.नं. २८/२०१८ भादविक ४२०, ३४
२२)व्ही.बी.नगर पोलीस ठाणे गु.र.नं.६५/२०१३ भादविक ४२०, ३४
२३) अंधेरी पोलीस ठाणे गु.र.नं.४५२/२०१४ भादविक ४२०, ३४
२४)पंतनगर पोलीस ठाणे गु.र.नं.४१/२०१३ भादविक ४२०, ३४
२५)पवई पोलीस ठाणे गु.र.नं.२९७/२०१४ भादविक ४२०, ३४
२६) नेहरू नगर पो. ठाणे गु.र.नं. १८३/२०१० भादविक ४२०,३४

**तसेच आरोपीवर अशा प्रकारचे आणखी १०० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत**.

- **उत्कृष्ट कामगिरी , तांत्रिक तपास व आरोपीस अटक करणारे पथक:-**

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे, २)सहा. पोलीस निरीक्षक निलेश पाटील,३)सहा. पोलीस निरीक्षक हर्षल कदम, ४)सहा. पोलीस निरीक्षक आर.एम.तडवी, ५)पोहवा/१०३१ रोहिदास पाटील,६) पोहवा/९८० विश्वास पवार,७) पोहवा/१५५७ बालाजी चव्हाण,८)पोना/२८८३ निलेश किंद्रे, ९)पोना/२६८३ शशीकांत जगदाळे, १०) पोना/२१८९ अजय वाघ,११) मपोना/ २१४८ दिपाली सांवत,१२)पोना/२०४९ दिपक मोरे १३) पोना/२९९९ धनाजी भांगरे १४) पोना/२७६३ रविंद्र सानप१५) पोकॉ/३५३८ संतोष मिसाळ,१६) पोकॉ/३५४२ गणेश कुटे, १७) चालक/सहा. पो.उप.निरीक्षक प्रदीप लिंगाळे १८) चालक/पो.शि./ भोईर

**********